GOVERNMENT OF MAHARASHTRA
District Institute of Education And Training,
Rahatoli, Dist.-Thane Post.- Badlapur,
Tal. Ambernath, Dist.Thane, Pin Code-421503

महाराष्ट्र शासन
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रहाटोली,
जिल्हा ठाणे,पो. बदलापूर,
ता. अंबरनाथ जि.ठाणे-४२१५०३

E-Mail :- dietthane@maa.ac.in / thanediet96@gmail.com

जा क्र. जिशिप्रसंर/शैक. साहित्य निर्मिती स्पर्धा/२०२५-२६/ ७२८०७. दि. २९/१०/२०२५.

प्रति,

१. मा. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)
२. मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (सर्व)
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (सर्व)
५. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
६. प्रशासन अधिकारी, मनपा, नपा (सर्व)

विषय : शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत.

संदर्भ : १. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०.
२. राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४.
३. मा संचालक, रा.शै.स.प्र.प.म. पुणे याचे पत्र क्र. जा. क्र. साव्यावि / राशैसंवप्रप / शिक्षक स्पर्धा/ २०२५२६/१/१४९०२७३/२०२५.दि.१०-१०-२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धांचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका ह्या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यानी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक सशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ह्या संस्थेच्या www.maa.ac.in ह्या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन २०२५-२६ वर्षापासून एकूण ४३ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे याच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व DIET कडून आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित DIET कडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. वरील ४३ स्पर्धांपैकी **शैक्षणिक साहित्य निर्मिती** या स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रहाटोली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.

Scanned with OKEN Scanner

**स्पर्धेचे स्वरूप :-**

सदरची स्पर्धा ही राज्य मंडळाच्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका) प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच खाजगी (अनुदानित व अंशतः अनुदानित) शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आहे.

- ही स्पर्धा सर्व राज्य मंडळाच्या अधिनस्थ शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी तसेच डायट मधील अधिकारी / कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी आहे.
- सर्व शिक्षक / शिक्षकेतर / पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यासाठी आहे.
- ही स्पर्धा सर्व विषयांसाठी लागू आहे.
- मुख्याध्यापक / प्राचार्य तसेच कार्यालय प्रमुख यांचे संमती पत्र असणे आवश्यक आहे.
- स्पर्धेचे सादरीकरण करणे बंधनकारक आहे.
- सादरीकरणाची भाषा मराठी / हिन्दी / इंग्रजी असावी व यापैकी कोणत्याही एका भाषेतून स्पर्धकाला सादरीकरण करता येईल मात्र विजेता सर्व भाषांमधून गटस्तरावर पहिल्या क्रमांकाचे विभाग स्तरावर पहिले पाच क्रमांकाचे व राज्य स्तरावर पहिल्या दहा क्रमांकाचे स्पर्धक निवडण्यात येतील.

**शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेची उद्दिष्टे :-**

- शिक्षकांमधील नवनिर्मिती क्षमता वृद्धींगत करणे, साहित्य निर्मिती कौशल्य वृद्धींगत करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन अध्यापनाची आवड निर्माण होण्यासाठी.
- विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन अध्यापनातील नवीन गोष्ट समजून घेण्यासाठी.
- शिक्षण क्षेत्रातील सर्व संबंधित घटकांनी विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे.
- शिक्षकांमध्ये आनंदायी वातावरण निर्माण करणे.
- कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे.

**शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेचे अपेक्षित सादरीकरणाचे मुद्दे :**

१) नवनिर्मिती

२) उपयोगिता

३) संकल्पना स्पष्टीकरण

४) सादरीकरण कौशल्य

५) चिकित्सक विचार

६) कल्पकता

**स्पर्धेचे नियम :-**

- प्रत्येक केंद्रातून एका स्पर्धकास सहभागी होता येईल.
- शैक्षणिक साहित्यात नावीन्यता असणे आवश्यक आहे.
- कोणत्याही समुदायाच्या भावना दुखावणारे शैक्षणिक साहित्य नसावे.
- स्पर्धेसाठी लागणारे शैक्षणिक साहित्य स्वतः स्पर्धकाने सोबत आणावे.

Scanned with OKEN Scanner

- अध्ययन निष्पत्ती साध्य होणे गरजेचे आहे.
- शैक्षणिक साहित्याची संकल्पना स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे.
- शैक्षणिक साहित्य हे अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेशी निगडित असावा.
- परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.
- शैक्षणिक साहित्य हे कॉपीराईट ॲक्टखाली मोडणारे नसावे.
- शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेसाठी स्पर्धकाकडे मुख्याध्यापकांचे संमतीपत्र असणे आवश्यक आहे.
- आवश्यकता असल्यास केंद्रप्रमुख/ केंद्र समन्वय केंद्रास्तरावर स्पर्धा घेऊ शकतात. मात्र केंद्रास्तरावर स्पर्धा घेण्याचे बंधन नाही.

**स्पर्धेचे मूल्यांकन:-**

- प्रत्येक स्तरावर (गट / विभाग / राज्य) सादरीकरणाच्या आधारावर शैक्षणिक साहित्याच्या मुल्यांवर, गुणवत्तेवर मूल्यांकन केले जाईल.
- ग्रामीण भागातील संपूर्ण तालुका हे गट म्हणून गणण्यात येईल. त्याच प्रमाणे मनपा हे देखील स्वतंत्र गट म्हणून गणण्यात येतील.
- गटस्तरीय स्पर्धा नोव्हेंबर २०२५ च्या पहिल्या शनिवारी दि. ८/११/२०२५ रोजी, विभागीय स्पर्धा शक्यतो डिसेंबर २०२५ च्या पहिल्या शनिवारी व राज्य स्तरीय स्पर्धा जानेवारी २०२६ च्या पहिल्या शनिवारी होतील. तारखेत होणारा बदल स्वतंत्र रित्या कळविला जाईल.
- गट स्तरावरील प्रथम क्रमांकाचा विजेता स्पर्धक हा विभागीय स्तरासाठी पात्र असेल. संबंधीताने विभाग स्तरावर सहभागी होणे बंधनकारक असेल.
- विभाग स्तरावरील पहिले पाच क्रमांकाचे विजेते स्पर्धक राज्य स्तरासाठी पात्र असतील. त्यांनी राज्य स्तरावर सहभागी होणे बंधनकारक असेल.
- प्रत्येक टप्प्यासाठी तेच शैक्षणिक साहित्य असणे बंधनकारक आहे.

**मूल्यांकनाचा तक्ता खालील प्रमाणे.**

| अ. क्र. | मूल्यांकनाचे विषय | गुण |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यावरील परिणामकारकता | १५ |
| २. | प्रस्तुतीकारणचा दर्जा | २० |
| ३. | प्रत्यक्ष उपयोगिता | १५ |
| ४. | सर्जनशीलता | १५ |
| ५. | नाविन्यता | १५ |
| ६. | संकल्पनेचे स्पष्टीकरण | २० |
| | एकूण गुण | १०० |

**पारितोषिकासाठीचा खर्च :**

केंद्र स्तर, तालुका स्तर, जिल्हा स्तर व राज्य स्तर शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेसाठी पारितोषिकाची रक्कम माननीय संचालक महोदयांच्या आदेशान्वये जाहीर करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

**स्पर्धेची कार्यवाही :**

**टप्पा -१** – केंद्रास्तरवरील सदर विषयासाठी (शैक्षणिक साहित्य निर्मिती) निवडलेला शिक्षक / शिक्षकेतर / पर्यवेक्षकीय अधिकारी / कर्मचारी हे नोंदणीसाठी राज्य स्तरावर पुरविण्यात आलेली लिंक गटात जेवढे केंद्र असतील तेवढ्या स्पर्धकांनी (प्रती केंद्र एक स्पर्धक) लिंक भरावी.

**टप्पा -२** – गट स्तरावर सदर स्पर्धक दि. ८/११/२०२५ रोजी सादरीकारण करतील. गटात जेवढे केंद्र असतील तेवढ्या स्पर्धकांनी सहभाग नोंदविणे आवश्यक असेल.

**टप्पा -३** – गट स्तरावरील प्रथम क्रमांकचा विजेता स्पर्धक विभाग स्तरावर सहभागी होईल. संबंधित विभागात जेवढे गट येतात तेवढेच स्पर्धक विभाग स्तरावर सहभागी होतील. संबंधित स्पर्धकांतून पहिले पाच विजेते निवडण्यात येतील.

**टप्पा -४** – विभाग स्तरावरील अनुक्रमे १ ते ५ विजेते राज्य स्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी होतील. सदर स्पर्धा ठाणे जिल्ह्यात घेण्यात येईल. राज्य स्तरिय शैक्षणिक साहित्यासोबत स्पर्धकाचा सादरीकरणाचा व्ही. डी. ओ. आवश्यक असेल. सदर स्पर्धा शक्यतो दि. २ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात येईल.

(डॉ संजय भा. वाघ )
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,रहाटोली
ता. अंबरनाथ, जि. ठाणे.

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर-

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई.
२. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.
३. मा. जिल्हाधिकारी, जिल्हा ठाणे.
४. मा. आयुक्त, मनपा (सर्व) जि. ठाणे.
५. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. ठाणे.
६. मा. शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग महाराष्ट्र राज्य.
७. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे.
८. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. ठाणे.
९. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. ठाणे.
१०. जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे.
११. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, (सर्व), जि. ठाणे.
१२. शिक्षणाधिकारी अधिकारी, मनपा, नपा (सर्व) जि. ठाणे.
१३. प्रशासन अधिकारी, मनपा, नपा (सर्व) जि. ठाणे.

Scanned with OKEN Scanner